


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३५०, रविवार २० ऑक्टोबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# एकी टिकविली तरच तुम्ही समोरच्याला पराभूत करु शकता !

## ■ अजित पवार यांची राष्ट्रवादीतील विविध गटांना साद ■ पारनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**पारनेरमध्ये उमेदवारीसाठी सगळे इच्छुक आहेत. सगळयांनाचा आमदार व्हावे वाटते. सुजित झावरेंना मागे संधी दिली मात्र त्यांना जमले नाही. त्यांना पुन्हा संधी हवी आहे. काशिनाथ दाते यांचे वय झाले म्हणून त्यांना संधी हवी आहे. विजय औटी नगराध्यक्ष होते म्हणून त्यांनाही संधी हवी आहे तर नगरचे म्हणून माधवराव लामखडे यांना उमेदवारी हवी आहे. एकाला कोणाला तरी उमेदवारी मिळणार आहे. तुम्ही एकी टिकविली तर समोरच्या उमेदवारला पराभूत करू शकता अशी साद राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादीमधील विविध इच्छुकांना घातली.**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर पारनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात पवार हे बोलत होते. खराब हवामानामुळे हेलीकॉप्टर येण्यास उशिर झाल्याने व्यासपीठावर येताच हाती माईक घेत पवारांनी उपस्थितांशी संवाद साधण्यास सुरूवात केली. त्यामुळे अजित पवार यांच्यासमोर बोलण्यासाठी उत्सुक असलेले इच्छुक उमेदवार चांगलेच हिरमुसल्याचे पहावयास मिळाले.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, पारनेर हा दुष्काळी तालुका आहे. वसंतराव झावरे, विजय औटी, नीलेश लंके यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. कोणी नेतृत्व करावे हा जनतेचा अधिकार आहे. लोकसभा निवडणूकीमध्ये जनतेचा कौल आम्हाला मिळाला नाही. महायुतीचे उमेदवार पराभूत झाले. विरोधकांकडून नकारात्मकता पसरविण्याचा प्रयत्न झाला. आरक्षण मिळणार नाही, संविधान बदलले जाणार असे सांगितले जात होते. आम्ही हा अपप्रचार खोडण्याचा प्रयत्न केला. संविधानाने देश एकसंघ ठेवण्याचे काम केले. जातीभेद न ठेवता सर्वांचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे. यशवंतराव चव्हाणांचीही हीच शिकवण आहे. ४०० पारच्या घोषणेवरून ४०० च्यावर बहुमत कशासाठी असा प्रश्न निर्माण केला गेल्याचेही पवार म्हणाले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या बांधकाम व कृषि समितीचे मा. सभापती काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे, माधवराव लामखडे, प्रशांत गायकवाड, विजय औटी, कपिल पवार, विक्रमसिंह कळमकर, भास्कर उचाळे, सुषमा रावडे, रखमाजी कापसे, अरूण ठाणगे, पंढरीनाथ उंडे, बाळासाहेब बोरकर, प्रभाकर कवाद, खंडू भुकन आदी उपस्थित होते.



■ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पारनेर येथील बाजारतळावरील मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### ज्याच्या घोषणा, त्याला उमेदवारी नाही !

अजित पवार यांचे भाषण सुरू झाल्यानंतर विजय औटी, सुजित झावरे, काशिनाथ दाते समर्थकांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यावर ज्याच्या नेत्याच्या नावाने घोषणा येतील त्या नेत्याला मी उमेदवारी देणार नाही असे सांगत पवार यांनी उत्साही समर्थकांना खडसावले. मी अजित पवार आहे. तुमचा आदर करतो. तुमच्या उत्साहाच्या जोरावरच निवडणूका जिंकायच्या आहेत, मात्र शिस्त पाळायला शिका असे पवार म्हणाले.

### डी झोनमध्ये महिलांना बसू द्या

डी झोनच्या बाहेर अनेक महिला उभ्या होत्या. पवार यांनी पोलीसांना डी झोनमध्ये महिलांना बसण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची सुचना केली. त्यानंतर डी झोनमध्ये महिला येऊन बसल्या.

### हा दुपारीच चंद्रावर गेलाय !

घोषणाबाजीवरून पवार यांनी विविध नेत्यांच्या समर्थकांना खडसावल्यानंतरही माधवराव लामखडे समर्थकाने पुन्हा घोषणाबाजी सुरू केली. पवार यांनी सांगूनही तो थांबण्यास तयार नव्हता. त्यावर हा दुपारीच चंद्रावर गेलेला दिसतोय अशी टीपन्नी करत साधू संतांनी आपल्याला काय विचार सांगितले हे लक्षात ठेवा असा सल्लाही पवारांनी दिला.

### लोककल्याणकारी योजना राबविल्या

लोकसभेला आम्हाला फटका बसला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व मी आम्ही सर्वजण कामाला लागलो. राज्याचे, शेतकऱ्यांचे, माय माऊल्यांचे हित कशात हे पाहून योजना आखल्या. मी राज्याचा दहा वेळा अर्थसंकल्प मांडला आहे. त्या अनुभवातून लोककल्याकारी योजना राबविण्यात आल्याचे पवार म्हणाले.

### होळकर, फुले, आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेवला

माय माऊल्यांकडे लक्ष दिले जात नाही. पुरूषांच्या बरोबरीने महिलांना वागणूक मिळणार नसेल तर देश पुढे जात नाही. अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, माता रमाई यांचा वारसा आपल्याला आहे. त्यांचा आदर्श ठेवला. तो विचार समोर ठेऊन लाडकी बहिण योजनेचा निर्णय घेण्यात आला. या योजनेचे खात्यावर आलेले पैसे परत जातील असे सांगून आमची टिंगल टवाळी करण्यात आली. आम्ही वेगळे करण्याचा प्रयत्न करत असल्याचे पवार यांनी सांगितले.

### एमआयडीसीत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय

पारनेर हा दुष्काळी तालुका आहे. सुपा एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होऊन चित्र बदलू लागले आहे. मात्र आज तिथे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय. पिंपरी चिंचवड, रांजणगांव गणपती येथेही एमआयडीसी आहेत, तिथे आम्ही असे प्रकार घडू देत नाहीत. कारण रोजगार निर्मिती हाच त्यामागील हेतू असल्याचे पवार म्हणाले.

### दादा आम्ही तुमचेच, पाण्याचं पाहा !

अजित पवार हे पाण्याच्या प्रश्नावर बोलत असताना भुमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली काही शेतकऱ्यांनी पाणी आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणा देत पवार यांनीच घोषणा केलेल्या पारनेरच्या हक्काच्या एक टीएमसी पाण्याच्या मागणीकडे लक्ष वेधले. त्यावर पवारांनी मी कुठे म्हणतोय माझ्या बापाचं आहे. तुझ्याच बापाचं आहे. असा प्रतिप्रश्न केला. तुला लंकेने पाठविले का ? ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी असतात असेही पवार यांनी सुनावले. त्यावर आम्ही तुमचेच आहोत पाण्याचं पाहा असे शेतकऱ्यांनी सांगितले. माझे कार्यकर्ते असे करत नाहीत असे सांगत पवार यांनी या विषयावर पडदा टाकला.

### तेलंगणाच्या धर्तीवर पाणी योजना राबवू

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी आम्ही निर्णय घेतले. पश्चिमेकडे समुद्रात वाहून जाणारे पाणी पूर्वेला आणून धरणे भरण्याचे नियोजन आहे. नाशिक जिल्हयात हा प्रयोग यशस्वी झाला आहे. तेलंगणामध्ये १ लाख अश्वशक्तीच्या मोटारींनी पावसाचे पाणी शेततळी, तलावांमध्ये सोडण्यात येते. असा प्रयोग करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे पवार म्हणाले.

### शेतकऱ्यांना दिवसा विज देणार

साडेसात अश्वशक्तीच्या मोटारींची वीज बिले माफ करण्याचा आम्ही निर्णय घेतला. शेतकऱ्यांना शुन्य बिल आले. जसे बोलतो तसे आम्ही वागतो. मी स्वभावाने कडक आहे पण शब्दाचा पक्का आहे. येत्या काही दिवसांत शेतकऱ्यांना टप्प्या-टप्प्याने दिवसा विज देण्यात येणार आहे. सोलर प्रकल्पासाठी ३५ हजार एकर जमीन घेण्यात आली असून लवकरच त्यातून विज निर्मिती होईल असे पवार म्हणाले.

### कारखान्यासंदर्भात अभ्यास करतो

पारनेर साखर कारखान्याच्या बाबतीत अनेक जण मत प्रदर्शित करतात. कारखान्याचा विषय कोर्टात आहे. त्याचा मी अभ्यास करेल. कारखाने मला चांगले चालविता येतात. आमचा माळेगाव कारखाना ३ हजार ६३६ सोमेश्वर ३ हजार ५७१ रूपये प्रतीटन भाव देतात. तुमच्याकडे जास्तीत जास्त तीन हजारांचा भाव मिळतो. चांगल्या दरासाठी कष्ट करावे लागतात, मेहनत घ्यावी लागते असे पवार म्हणाले.

### जागतिक बँकेच्या माध्यमातून कायापालट

माणूसकी हीच आमची जात आहे. प्रत्येक योजना आम्ही सुरू ठेवणार आहोत. केंद्र सरकार आमच्या विचारांचे आहे. लोकसभा निवडणूकीत आम्हाला फटका बसला. कांदा उत्पादक शेतकरी कांदा दरामुळे नाराज होते. निर्यातबंदीमुळे भाव पडायचे. आम्ही निर्यातीवरील बंदी उठविली. केंद्र सरकार आपल्या विचारांचे असल्याने आपण विविध प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून अर्धा टक्का व्याजदराने कर्ज उपलब्ध करता येईल.त्यातून कायापालट करता येईल.पश्चिमेचे पाणी पुर्वेकडे नेण्यासाठी केंद्र सरकार निधी देणार असल्याचेही पवारांनी सांगितले.

### नीलेश लंके यांना दोन हजार कोटींचा निधी दिला

नीलेश लंके यांच्या विजयासाठी आपण प्रयत्न केले. कोरोना संकटात सहकार्य केले. महत्वाच्या पदावर गेल्यावर लोक बदलतात. लंके यांच्याभोवतीच्या चांडाळ चौकडीने वाट लावली. लंके यांना मी तीन वर्षात दिड ते दोन हजार कोटी रूपयांचा निधी दिला असे पवार म्हणाले.

### पैसे बुडविणारांना सोडणार नाही

पारनेर तालुक्यात काही चांगल्या, वाईट पतसंस्था आहेत. जनतेचे पैसे घेता आणि ते बुडविता ? अशा लोकांना मी सोडणार नाही मग ती व्यक्ती कितीही मोठी असो असे सांगत पतसंस्थांमध्ये घोटाळे घालणाऱ्या पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांना पवार यांनी इशारा दिला.

**कृषीनाथ ग्रीन एनर्जी लि. कृषीनाथनगर**
(सोपानराव बाळकृष्ण धसाळ ॲग्रो. प्रॉ. लि. संमीलित)
माळकुप, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

**सस्नेह निमंत्रण**

आपल्या कारखान्याचा द्वितीय गळीत हंगाम वर्ष २०२४-२५

**बॉयलर अग्नीप्रदिपन व गव्हाण पुजन कार्यक्रम**

**रविवार** दि. २०/१०/२०२४, सकाळी ११:०० वाजता

: कार्यक्रमाचे अध्यक्ष :
**मा.डॉ. श्री. पांडुरंग राऊत**
चेअरमन, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. पाटेठाण

: प्रमुख पाहुणे :
**मा. खासदार श्री. निलेशजी लंके साहेब** — खासदार, दक्षिण नगर लोकसभा मतदार संघ
**मा. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार** — कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्य

: प्रमुख उपस्थिती :
**मा.श्री.जगदीश पुरुषात्तम कश्यप** — मुख्य कार्यकारी अधिकारी, जनता सहकारी बँक लि. पुणे
**मा.डॉ.श्री.अशोक बी. माने** — मुख्य सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
**मा.श्री. अनंत नारायण कुलकर्णी** — कार्यकारी संचालक, व मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण जनता सहकारी बँक
**मा.सौ. अपेक्षिता उदय ठिपसे** — सरव्यवस्थापक, कॉसमॉस सहकारी बँक लि. पुणे
**मा.श्री. संजय काळे** — सरपंच , ग्रामपंचायत माळकुप
**सौ. लीलाबाई भाऊसाहेब रोहोकले** — सरपंच, ग्रामपंचायत भाळवणी
**सौ. नंदाताई भागाजी गावडे** — सरपंच, ग्रामपंचायत ढवळपुरी
**मा.श्री.राहुल घंगाळे** — उपसरपंच, ग्रामपंचायत माळकुप
**मा.श्री. आप्पासाहेब बबन रोहोकले** — उपसरपंच, ग्रामपंचायत भाळवणी
**मा.श्री. बबन पवार (सर)** — उपसरपंच, ग्रामपंचायत ढवळपुरी

: बॉयलर अग्नी प्रदिपन :
**सौ.व श्री गौरी आकाश रविंद्र भुजबळ** — प्रवर्तक, कृषिनाथ ग्रीन एनर्जी लि.
**डॉ.सौ. व श्री. रुपाली सुनिल महादेव शिंदे,** — प्रवर्तक, कृषीनाथ ग्रीन एनर्जी लि.

: गव्हाण पुजन :
**सौ. व श्री. ऐश्वर्या सोमेश सुनिल जेरथ,** संचालक कृषीनाथ ग्रीन एनर्जी लि.

मान्यवरांचे उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. आपली सहकुटुंब उपस्थिती प्रार्थनिय आहे.

Vitthala Publicity

: आपले विनित :
**श्री. प्रकाश मुरलीधर मते** — मुख्य कार्यकारी अधिकारी
**श्री. अनिल संपतराव मोहिते** — उपाध्यक्ष
**श्री. रविंद्र ज्ञानेश्वर भुजबळ** — कार्याध्यक्ष
**श्री. महेश संभाजीराव करपे** — अध्यक्ष व कार्यकारी संचालक

: मा. संचालक मंडळ :
श्री. नरेश पोपटराव करपे
डॉ. सौ. वंदना पोपट मते
श्री. दिपक शिवाजी गोरे
श्री. मानव आहलुवालिया
श्री. नितीन शंकर गडदे, तज्ञ संचालक
श्री. मल्हारी ज्ञानोबा चांधेरे
श्री. भारत आण्णा टिळेकर
श्री. लहू बबन जमदाडे
श्री. गणेश आण्णा टिळेकर
सौ. कविता राजेश बनकर
श्री. अपूर्व अशोक पलांडे
श्री. जयदिप प्रदिप दोशी
श्री. सर्जेराव रखमाजी खेडकर, तज्ञ संचालक
श्री. भाऊसाहेब जयसिंग आव्हाळे
श्री. सचिन अर्जुन पारखे
श्री. बाळासाहेब गुलाब चांधेरे

व सर्व प्रवर्तक, अधिकारी व कर्मचारी वृंद, कृषीनाथ ग्रीन एनर्जी लि.

टिप :- कार्यक्रमानंतर, भोजन व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना दिवाळी निमित्त साखर वाटप होणार आहे.


**कार्यक्रमाचे स्थळ :** कृषीनाथ ग्रीन एनर्जी लि. कृषीनाथ नगर, मौजे माळकुप, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# नवरी का घालते हिरव्या बांगड्या?

**महाराष्ट्रीयन लग्नातील दागिन्यांची फॅशन ही हिरव्या बांगड्यांशिवाय पूर्ण होत नाही. नवरीच्या हातात भरभरून हिरव्या बांगड्या घातल्या जातात आणि या बांगड्या घालण्याची परंपरागत रीतही आहे. नवरीच्या हातातील या बांगड्यांना 'हिरवा चुडा' असंही म्हटलं जातं. आपण परंपरेनुसार या हिरव्या बांगड्या घालतो पण त्याचे महत्त्व तुम्हाला माहीत आहे का ? हेच आपण जाणून घेऊया...**



भारतामध्ये साधारण २० किलोमीटरच्या अंतरावर भाषा आणि संस्कृती तसंच फॅशनही बदलताना दिसून येते. लग्नाबाबत जेव्हा परंपराबाबत चर्चा होते, तेव्हा महाराष्ट्रीयन लग्नाचे वैशिष्ट्य म्हणजे नऊवारी साडी आणि हिरव्या बांगड्या. याशिवाय लग्न लागले असं वाटतंच नाही. भारतामध्ये अधिक ठिकाणी लाल बांगड्या घालण्याची प्रथा आहे मात्र महाराष्ट्रीयन नवरी ही नेहमी हिरवा चुडाच घालते.

## नवरी का घालते हिरवा चुडा ?


महाराष्ट्रातील कोणत्याही भागात लग्नामध्ये नवरीच्या हातात हिरवा चुडा दिसून येतो. मात्र याचे महत्त्व नक्की काय आहे असा प्रश्न कधी ना कधी तुमच्या मनात येतच असेल ना ? ज्योतिषाचार्य राधाकांत वत्स यांनी याबाबत अधिक माहिती देत सांगितले की, देवीचे प्रतीक आणि सौभाग्याचं लेणं म्हणून हिरवा रंग मानला जातो आणि यामुळेच नवरी आपल्या श्रृंगारात हिरव्या रंगाच्या बांगड्यांचा समावेश करते.

## शुभ रंग हिरवा

देवीच्या गाभाऱ्यामध्ये हिरवी साडी, हिरव्या बांगड्या हे शुभ मानले जात असल्यामुळेच हिरव्या रंगाच्या बांगड्या परिधान केल्या जातात. नवरीच्या आयुष्यात कायम सुख, समाधान आणि हिरव्या रंगाप्रमाणे ताजेपणा राहावा यासाठी हा रंग वापरण्यात येतो. वैवाहिक आयुष्य रचनात्मक, सकारात्मक, प्रेमळ आणि समृद्ध होते असाही समज आहे.

## हिरव्या बांगड्या कशा घालाव्या

नवरीचा हात हिरव्या बांगड्यांनी भरलेला असतो आणि काळ्या रंगलेल्या मेहंदीसह हा रंग अत्यंत उठावदार दिसतो. मात्र सोन्याच्या बांगड्यांसह सहसा या बांगड्या घातल्या जातात. सोन्याच्या बांगड्या सम अंकामध्ये तर काचेच्या हिरव्या बांगड्या या विषम अंकामध्ये घालण्याची प्रथा आहे.



## कशी करावी स्टाईल ?

- विषम हिरव्या बांगड्यांसह मध्ये बारीक सोन्याची बांगडी घालावी. सुरुवातीला आणि शेवटी पाटल्या घालाव्यात.
- सोनं आणि हिरव्या बांगड्या हे कॉम्बिनेशन खूपच सुंदर आणि आकर्षक दिसते.
- हिरव्या बांगड्यांसह मोत्याच्या बांगड्यांची फॅशनही सुंदर दिसते.
- याशिवाय सोनं आणि हिऱ्यांनी जडवलेल्या बांगड्या आणि त्यामध्ये हिरव्या बांगड्या अशी फॅशनही नवरीला अधिक सुंदर दिसण्यास मदत करते.
- सोनं आणि कुंदन जडवलेल्या बांगड्या आणि हिरवा चुडाही दिसायला सुंदर दिसतो.



# लग्नपोशाख आणि फॅशन !

**सध्या लग्नसराईचा माहौल आहे. त्यातही वधू आणि वराची मोठी लगबग सुरू असते ती लग्नासाठीच्या पोशाखाची. ऑनलाइन बाजारहाट केली काय किंवा ऑफलाइन केली काय, नामवंत 'ब्रॅण्ड्स' हे लग्नसराईसाठी विशेष कलेक्शन्स घेऊन आले आहेत. परदेशातील फॅशन ब्रॅण्ड्सचा मागोवा घेत आपल्याकडील मंडळी तिकडच्या लेबल्सचे कपडेही लग्न सोहळ्यांकरता मागवू लागली आहे. लोकल मार्केटमध्येही खास लग्नासाठी भारी पद्धतीचे फॅशन गारमेंट्स उपलब्ध होऊ लागले आहेत. त्यामुळे सगळीकडेच लग्नसराईच्या खरेदीचे अनेक पर्याय असल्याने आनंदाने खर्च करू पाहणाऱ्यांना यंदाच्या वेडिंग सीझन फॅशनची मजा लुटता येणार आहे...**

लग्नाचा पेहराव आणि पेस्टल रंग यांचं जणू घट्ट नातंच होऊन बसलं आहे. खरं तर इतर कुठल्याही फॅशनप्रमाणे वेडिंग फॅशनचे ट्रेण्ड्सही सातत्याने बदलत असतात. पेस्टल रंगातील पेहरावाला मोठी मागणी आहे. हल्लीच्या लग्न सोहळ्यांमध्ये लग्नाच्या महत्त्वाच्या विधींबरोबरच मेंदी, संगीत आणि इतर छोट्या-मोठ्या सोहळ्यांची रेलचेल असते. गेल्या काही महिन्यांत झालेल्या सेलिब्रेटींच्या लग्न सोहळ्यांवर नजर टाकली तर त्यात संगीत, मेंदी या सोहळ्यांसाठी गडद रंगाचे पोशाख आणि मुख्य विधीसाठी पेस्टल रंगातील पोशाख अशी तयारी केलेली दिसते. हल्ली लग्न सोहळ्यांचे मुख्य आकर्षण असते ते सप्तपदी. यासाठी पेस्टल रंगामध्येही पूर्वी जे फक्त लाल आणि गुलाबी रंगाचे वेड होते ते कमी झाले आहे. त्याऐवजी जांभळा किंवा पिवळा अशा रंगातील छटांची प्राधान्याने निवड केली जाते आहे. त्यातही खास सप्तपदीसाठी वधूने लाल रंगाचा पोशाख केला असेल तर वर सफेद रंगातील पोशाख निवडून रंगसंगती खुलवताना दिसत आहेत.


## वधू पोशाख

वधूसाठी यंदा खास आकर्षण आहे ते भरजरी दुपट्ट्याचं. लेहंग्याला साजेसा असा दुपट्टा तसेच चोळी यांची निवड करणं शक्य आहे. अर्थात ज्यांना पारंपरिक लाल रंगातील लेहंगा- चोली हवी आहे त्यांना रंगसंगतीचा विचार करण्याची गरज नाही. मात्र थोडासा हटके विचार करायचा असेल तर विविध रंगसंगतीचे लेहंगा- चोळी आणि दुपट्टा तुम्ही परिधान करू शकता. दुपट्ट्याच्या काठालाही खूप वैविध्यपूर्ण नक्षीकाम केलेले तुम्हाला पाहायला मिळतं. कारण फक्त प्लेन डिझाइन्सच्या भरजरी ओढण्या, निदान लग्नात तरी डोक्यावरून घेणं वधूला फारसं रुचत नाही. त्यातही त्यांना काही तरी कल्पक डिझाईन्स हवे असतात. उदाहरणार्थ, विरुद्ध रंगच्छटा असलेले ओढण्यांवरील काठ, ओढण्यांवरील लटकन, वेल्वेटचे काठ, सोन्याचे काठ, भरलेले नक्षीदार काठ, गोटा किंवा टस्सेलचे काठ, फ्रिल काठ इत्यादी वेगवेगळे प्रकार सध्या पाहायला मिळतात. क्रेप, जॉर्जेट, झारी, शिफॉन, ऑरगंजा, चिकनकारी अशा विविध फॅब्रिक्सच्या दुपट्ट्यांवर या नानाविध प्रकारातील काठ सजवलेले असतात. लेहंग्यासाठीही ऑरगंजा, नेट एम्ब्रॉयडरी, बनारसी सिल्क, जॉर्जेट, सेमी स्टिच, पॅनेल्ड (खरं तर पॅनेल्ड लेहंगे आणि मल्टिकलर लेहंगे थोड्या अधिक प्रमाणात वेगळे असतात तर खरेदी करताना याची काळजी घ्यावी), सेमी एम्ब्रॉयडरी, गोटा वर्क, झारी वर्क, मिरर वर्क, फ्लोरल प्रिंट, व्हाईट एम्ब्रॉयडरी, मोती वर्क असे हरएक प्रकार तुम्हाला मिळतील. लेहंग्याऐवजी कांजीवरम साड्यांचा पर्यायही तुम्हाला खुला आहे ज्यावर कमरपट्टा, गजरा आणि सोन्याचे दागिने परिधान करून एक वेगळा लुक मिळेल.



## वर पोशाख

वर पक्षाला फॅशनमध्ये खूप सारे बदल अनुभवता येत नसले तरी वैयिक्तक किंवा कस्टमाईज्ड फॅशन आणि हॅण्डमेड कपड्यांना त्यांच्याकडून अधिक प्राधान्य दिलं जाईल, असा अंदाज फॅशन डिझायनर्सनी व्यक्त केला आहे. फॅशन डिझायनर कुणाल रावलच्या माहितीनुसार ऑलिव्ह, डीप वाईन, डीप चारकोल्स, लेमन आणि पेस्टल हे कलर पॅलेटमध्ये पाहायला मिळतील. शेरवानी आणि जॅकेटचा ट्रेण्ड या लग्नसराईत दिसेल, त्याचप्रमाणे एम्बलिश्ड दुपट्ट्याची मागणी वर पक्षाकडूनही होताना दिसते. याशिवाय, त्यांच्या वेडिंग फॅशनमध्ये मोजडी, फेटा, ब्रुच आणि गळ्यातील एक्सेसरीजवर जास्त भर दिलेला पाहायला मिळतो. यातही मोजडीमध्ये पांढऱ्या रंगाची फॅशन आहे, त्यावर उठावदार नक्षी हवीच. दुहेरी रंगातील फ्लोरल नक्षी मोजडीवर अवतरलेली दिसेल. मोजडीपेक्षा जूती आणि लॉफर्सही तूम्ही परिधान करू शकता. या चपलांमध्ये फिकट रंग असले तरी एम्ब्रॉयडरी गडद रंगात असते. फेट्यामध्येही यंदा ब्राईट रंग ट्रेण्डमध्ये आहेत. त्यातही केशरी रंग खूप उठावदार दिसतो. वेडिंग सीझनला सप्तपदीच्या वेळी वरासाठी पांढऱ्या शेरवानीवर ब्राईट रंगाच्या फेट्यांचा ट्रेण्ड फॉलो होताना दिसतो आहे. इतर फिकट रंगावरदेखील ब्राईट रंगाचे फेटे सूट होत आहेत, पिस्ता कलरच्या शेरवानीवर गडद केशरी किंवा लाल रंगाचा फेटा घालून खांद्यवर मल्टिकलर किंवा कॉन्ट्रास्ट दुपट्टा घेतला तर मस्त रॉयल लूक मिळतो. फेट्यांमध्ये कलगीतुरा असावा ही हल्ली प्रत्येक वराची अपेक्षा असते. ब्रुचच्या बाबतीत तर हटके प्रयोग होत आहेत. डायमंड ब्रुचपेक्षा आता टस्सेल ब्रुच किंवा शिंपल्यांच्या शेलपासून बनवलेल्या ब्रुचची क्रेझ आहे. गळ्यातल्या दागिन्यांमध्ये सध्या तरी कुंदनचे दागिने अधिक दिसत आहेत. पण त्यातूनही हल्ली मुलं रॉयल लुक ठेवण्यावर भर देतात ज्यामध्ये मनारकली, फेटा, पगडी, सरपेच, मोत्यांची माळ, तलवार, मोजडी असा लुक अत्यंत आकर्षक वाटतो. खास लग्नसोहळ्यासाठी नानाविध रंग आणि कापडाचे लोकल ते ग्लोबल पोशाख मार्केटमध्ये सहज उपलब्ध आहेत. सगळीकडेच लग्नसराईच्या खरेदीचे अनेक पर्याय असल्याने आनंदाने खर्च करू पाहणाऱ्यांना यंदाच्या वेडिंग सीझन फॅशनची मजा लुटता येणार आहे.




## टॉप ट्रेण्ड्स


फॅशन डिझायनर्सच्या म्हणण्यानुसार यंदा सस्टेनेबल फॅशनला अधिक वाव मिळणार आहे. त्याचबरोबरीने लाल रंगातील लेहंगा आणि चोळी हा लग्नपोशाख टॉप ट्रेण्डवर आहे. वधू पारंपरिक लेहंग्याला अधिक प्राधान्य देताना दिसते आहे. डिझाइन्समध्ये मिनिएचर नक्षीवर भर दिसून येतो आहे. तर एकंदरीतच वधू- वरांच्या वैयक्तिक आवडीचा प्रभाव हा लग्नसराईतील पेहरावावर दिसून येईल, असे डिझायनर्सचे म्हणणे आहे.

## काही टिप्स...

दागिने निवडताना ते कुंदन, सोनं, डायमंड, लेअर्ड नेकपीसेस, चोकर आणि गोल्डन हेवी बांगड्या घालायला विसरू नका. मराठमोळा लुक करणार असाल तर नक्कीच शालू आणि मराठमोळ्या वजट्रिका, बाजूबंद, लक्ष्मीहार, चपलाहार, पैंजण इत्यादी सदाबहार पारंपरिक दागिने तुम्ही परिधान करू शकता. मुलंही मराठमोळी भीकबाळी, पगडी त्यावर सरपेच तसेच अंगरखा परिधान करत पेशवाई लुक कॅरी करू शकता. वधूच्या हातात नानारंगी, नानाढंगी पोटल्या खास शोभून दिसतात.



# नवरीचा 'एचडी मेकअप' काय आहे?



लग्न हा प्रत्येक तरुणीच्या आयुष्यातील सर्वात आनंदा दिवस असतो. प्रत्येक नवरीला आपल्या लग्नात सुंदर दिसायचे असते. कारण लग्नामध्ये नवरीचा मेकअप सर्वात जास्त लक्ष वेधून घेतो. सर्वांच्या नजरा फक्त नवरीकडेच असतात. मेकअप केल्याने तुमचा संपूर्ण लूक बदलून जातो. पण जर तुमचा मेकअप खराब झाला तर पूर्ण लूक फिका पडतो. अशा स्थितीमध्ये तुम्ही स्वतःसाठी योग्य मेकअप निवडला पाहिजे जो तुमची सुंदरता आणखी खुलवेल. त्यामुळे आजकाल नवरीचा HD मेकअप केला जातो. सध्या खूप ट्रेंड होत असलेल्या या मेकअपमध्ये तुमच्या चेहऱ्यावरील सर्व डाग लपवले आणि प्रत्येक छोटी गोष्ट लक्षात घेऊन मेकअप केला जातो. एचडी कॅमेऱ्यात फोटो काढले जाणार आहेत हे लक्षात घेऊन हा मेकअप केला जातो. जाणून घ्या एचडी मेकअप म्हणजे काय आणि तो कसा केला जातो...


- एचडी मेकअप म्हणजे हाय डेफिनेशन मेकअप लुक, ज्यामध्ये एचडी कॅमेऱ्यात फोटो काढले जाणार आहे हे लक्षात घेऊन मेकअप केला जातो. आजकाल, विवाहसोहळ्यांमध्ये एचडी कॅमेऱ्यांद्वारे फोटोशूट केले जातात जे अगदी लहान गोष्ट देखील कॅप्चर करतात. या मेकअपमुळे चेहऱ्यावर दिसणारे डाग लपलेले जातात. आजकाल बहुतेक सेलिब्रिटी हा मेकअप करतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरही मेकअप आर्टिस्ट एचडी मेकअपच करतात. हे पूर्णपणे नैसर्गिक, डागविरहित आणि नॉन-केकी (मेकअपचा थर दिसणार नाही असा) लुक देते. एचडी मेकअपमध्ये चेहऱ्यावर लावलेली उत्पादने ब्रशच्या साहाय्याने अशा प्रकारे लावली जातात जे तुमच्या चेहऱ्याचे सौंदर्य अनेक पटींनी वाढते.

## एचडी मेकअप उत्पादने काय आहेत ?

एचडी मेकअपमध्ये वापरण्यात येणारी उत्पादने उच्च दर्जाची आणि लाईट डिफ्यूझिंग कोटिंग असलेले असतात आहेत. या मेकअपसाठी तुम्हाला अशी उत्पादने निवडावी लागतील जी तुम्हाला मुलायम, पारदर्शक आणि डाग विरहित लुक देईल. मेकअप त्वचेवर अशा प्रकारे लावला केला जातो की तो अजिबात जास्त वाटत नाही. मेकअप केल्यानंतर नैसर्गिक चमक दिसून येते.

## कसा करायचा एचडी मेकअप ?

एचडी मेकअप देखील सामान्य मेकअपप्रमाणेच केला जातो. यात उच्च दर्जाची उत्पादने वापरली जातात. जी खूप महाग असतात. ब्रश आणि स्पंजच्या मदतीने मेकअप चांगले मिसळले जाते. त्याचे मिश्रण सर्वात महत्वाचे आहे जे तुम्हाला एक अतिशय नैसर्गिक असल्याचा अनुभव देते. मेकअपमध्ये प्रीमियम दर्जाची उत्पादने वापरली जातात



## शॉर्ट न्यूज

### अकोलेत वाढले तीन हजार नवे मतदार

■ **अकोले :** विधानसभा मतदार संघात लोकसभेनंतर जवळपास तीन हजार नवीन मतदाराची नोंदणी झाली असून २०२४ सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी लाख ३८ हजार ८४५पुरुष, १ लाख २७ हजार२८३ महिला, १ तृतीयपंथी असे एकूण २लाख ६६ हजार१२९ मतदार आहेत. अकोले पोलिस ठाणे हद्दीतील नागरिकांना आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांनी केले. ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदारांचे घरी जाऊन मतदान घेतले जाणार आहे, असे आवाहन तहसीलदार सिद्धार्थ मोरे व उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा निवडणूक निर्णय अधिकारी अनुप यादव यांनी केले आहे.

### कनिष्ठ महाविद्यालयाचे बॉलबॅडमिंटन स्पर्धेत यश

■ **राहुरी :** कनिष्ठ महाविद्यालयाने जिल्हास्तरीय बॉलबॅडमिंटन क्रिडा स्पर्धेत चमकदार कामगिरीचे दर्शन घडविले आहे. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील संघांनी सहभाग घेतला होता. १९ वर्षे वयोगटात लोकनेते रामदास पाटील धुमाळ कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत त्यांची विभाग स्तरावर निवड झाली. तर मुलांच्या संघाने जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला. शालेय विभागीय स्पर्धा मंगळवेढा, सोलापूर याठिकाणी होणार आहेत.

### रस्त्यासाठी निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा

■ **शेवगाव :** मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सुरू असलेल्या ठाकूर पिंपळगाव, लखमापुरी, पैठण रस्त्याचे काम बंद पडले आहे. ते त्वरित सुरू करा, अन्यथा येत्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यावावत लखमापुरी, प्रभुवाडगाव, खडके व मडके या गावांतील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री व संबंधितांना निवेदन दिले आहे. हा रस्ता व्हावा, ही या चार-पाच गावांतील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती. काही कालावधीनंतर मुख्यमंत्री ग्रामसडकयोजनेंतर्गत या रस्त्याचे काम सुरू झाले.

### मतदान वाढविण्यासाठी केंद्रांवर मर्जिंग

■ **संगमनेर :** विधानसभा मतदारसंघात १० नवीन मतदान केंद्र वाढविण्यात आली आहेत. तसेच मतदानाच्या दिवशी मतदारांची गर्दी होणाऱ्या १३ ठिकाणी मतदान केंद्रांवर मर्जिंग करण्यात आले आहे. त्यामुळे मतदान वाढेल, अशी माहिती संगमनेरचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश हिंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संगमनेर विधानसभा मतदारसंघात एकूण २८८ मतदान केंद्र आहेत.

### स्वस्त धान्याच्या लिलाव प्रक्रियेतून वादंग

■ **श्रीगोंदा :** प्रशासनाने जप्त केलेल्या स्वस्त धान्याच्या लिलाव प्रक्रियेतून श्रीगोंदा येथे चांगलाच वादंग झाला आहे. या प्रकारातून श्रीगोंदा पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार ११ ते १६ ऑक्टोबरदरम्यान श्रीगोंदा येथील शासकीय गोदाम परिसरात घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. धान्याचा लिलाव घेणारे अजित संजय लाटे यांनी याबाबत फिर्याद दिली. यावरून सतीश हिरडे, सुनील मुनोत, तात्याराम झराड , अजित कोठारी,टिळक भोस यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता ३०८ (५) अन्वये गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

# संधीचे सोने केले तर यशप्राप्ती निश्चित!

■ साहित्यिक संजय कळमकर यांचा कानमंत्र ■ जयहिंद शैक्षणिक संकुलाचा वर्धापन दिन ■ स्व. तात्यासाहेब गुंजाळ यांचा स्मृतीदिन संपन्न ■ वै. विष्णु पाटीलबा शिंदे यांना स्व. तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार प्रदान




**नारायणगांव : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांना संकट व संधी दोन्ही आयुष्यात येत असतात पण संकटावर मात करून संधीचे सोने केले तरच आयुष्यात यश प्राप्त करता येते. आपल्यामधील क्षमतेची जाणीव ही आयुष्यात संकट अथवा संधी आल्यानंतरच होते. विद्यार्थी म्हणून अभ्यासाबरोबरच उपलब्ध संधी शोधून त्याचा परिपुर्ण लाभ घ्यावा, असे मत प्रसिध्द साहित्यिक व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केले.**

कुरण येथील जयहिंद कॉम्प्रेहेन्सिव्ह एज्युकेशनल इन्स्टिट्युटचा वर्धापन दिन व शिवनेरभूषण शिक्षणमहर्षी स्व. तात्यासाहेब गुंजाळ यांचे पुण्यस्मरण कार्यक्रमाच्या प्रसंगी 'आमचे भविष्य आमच्या हाती' या विषयावर डॉ. कळमकर यांचे व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी ''स्व. तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. कर्जुले हर्या गावचे वै. विष्णू पाटीलबा शिंदे यांना त्यांच्या निस्वार्थ समाजसेवा तसेच धार्मिक, शैक्षणिक व बॅंकिंग अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल हा पुरस्कार मरणोत्तर देण्यात आला. वै. शिंदे हे त्यांच्या साधी राहणी व उच्च विचारसरणी करिता पंचक्रोशीत ओळखले जात असत. तसेच त्यांनी ग्रामीण भागातील तरूणांना व्यवसाय उभे करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या पत्नी वेणूबाई व मुलगा संतोष शिंदे यांनी या पुरस्काराचा स्विकार केला. हा पुरस्कार स्व. तात्यासाहेबांचे बंधू रावजी गुंजाळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

जयहिंद शैक्षणिक संकुलाची स्थापना स्व. तात्यासाहेब गुंजाळ यांनी २७ वर्षापुर्वी केली. कुरणच्या माळरानावर आज त्याचा वटवृक्ष झालेला आहे. आज या शैक्षणिक संकुलात के.जी. ते पी.जी. पर्यंतचे अभ्यासक्रम या शैक्षणिक संकुलात शिकवले जात आहेत. पॉलिटेक्निक, इंजिनिअरींग , फार्मसी, आय.टी.आय., एम.बी.ए.,एम.सी.ए.,बी.सी.ए, इंग्लिश मेडीयम स्कुल व ज्यु. कॉलेज अशा शाखा चालवल्या जात आहेत. या सर्व शाखांचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव विजय गुंजाळ यांनी दिली.

पुरस्काराचा स्विकार केल्यानंतर स्व. तात्यासाहेबांच्या कार्याची उंची खुप मोठी आहे. काही असामान्य व्यक्तिमत्वच इतिहास घडवत असतात. पुण्यतिथी व जयंती सर्वांची केली जात नाही. हे कार्यक्रम म्हणजे असामान्य कर्तृत्वाचे केलेले स्मरण होय, असे मत श्री हरेश्वर विद्यालय कर्जुले हर्याचे मुख्याध्यापक मधुकर बर्वे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जितेंद्र गुंजाळ होते. तर यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व माजी आमदार बाळासाहेब दांगट, खजिनदार धर्मेंद्र गुंजाळ, तसेच विष्णू पाटीलबा शिंदे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ठकाशेठ वाफारे, जयहिंद शैक्षणिक संकुलाचे सर्व संचालक मंडळ तसेच सर्व शाखांचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. हेमंत महाजन यांनी केले तर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दत्तात्रय गल्हे यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री काय यंदा आमदार सुध्दा होणार नाहीत!

■ डॉ.विखेंचा बाळासाहेब थोरातांना टोला
■ तळेगावची सभा परिवर्तनाची नांदी!
■ डॉ.विखेंचे तळेगावमध्ये जोरदार स्वागत



**संगमनेर : प्रतिनिधी**

**आजची सभा हा फक्त ट्रेलर आहे.या तालुक्यात परिवर्तन करण्यासाठी महिलांचा वाटा खूप मोठा असणार आहे. युवकांनी सुध्दा मागे न राहाता तालुक्यातील दहशत झुगारून परिवर्तनासाठी पुढे आले पाहिजे.तालुक्यातील ठेकेदारी संस्कृती तुमचा विकास करू शकणार नाही अशा शब्दात डॉ. सुजय विखे पाटील यांनी आ.बाळासाहेब थोरात यांच्यावर निशाणा साधला.मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पाहणारे यंदा आमदार सुध्दा होवू शकणार नसल्याचा टोला त्यांनी लगावला.**

तळेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या युवा संकल्प मेळाव्यात डॉ. सुजय विखे पाटील यांनी थोरातांच्या चाळीस वर्षाच्या कार्यपध्दतीवर जोरदार टिका केली. वर्षानुवर्ष या भागातील महीलांच्या डोक्यावरील हंडा उतरवू न शकलेले कोणत्या विकासाची भाषा करतात असा प्रश्न करून या तालुक्यात फक्त नातेवाईकांसाठी राजकारण झाले.नाते ठेकेदार आणि जमीनीचा ताबा मिळवणारे एवढीच ओळख पद वाटताना दाखवली जाते.पण तळेगाव निमोण भागातील तरूणांनी या मातीची शान राखून परीवर्तन केले.असेच परिवर्तन आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत करायचे असून दोन दिवसात पक्षाचा निर्णय होवून संगमनेर विधानसभा मतदार संघाची जागा भाजपाच्या वाट्याला येईल असा विश्वास व्यक्त केला.

### यशोधनच्या सूत्रांवर विश्वास ठेवू नका : डॉ विखे

**डॉ. सुजय विखेंना तिकीट नाकारले अशा बातम्या जाणीपुर्वक पेरल्या.कोणत्या सूत्रांची माहीती आहे तुम्हाला माहीत आहे का ? यशोधनच्या सूत्रांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करून संगमनेरचा मतदार संघ भाजपाला मिळणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.**

चाळीस वर्षे तालुक्याला मोठी पद मिळाली.पण निधी आणता आला नाही.ना.विखे पाटील यांच्या माध्यमातून तळेगावला ४४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला. निळवंडे धरणाचे पाणी आले.अनेक वर्ष फक्त विखे पाटील परीवारावर टिका केली.पण साईबाबांचे आशीर्वादाने विखे पाटील कुटूंबातील मुलगाच जिल्ह्याचा पालकमंत्री झाला आणि निळवंड्याचे पाणी आणून दाखवले आता भोजापूर चारीचे पाणी सुध्दा विखे पाटीलच आणून दाखवतील असा दावा त्यांनी करताना पुढची चाळीस वर्षे तालुक्यातील युवकांच्या उज्वल भवितव्याची असतील अशी ग्वाही त्यांनी दिली.

अनेक वर्ष एकाच घरात सता असल्याचा आरोप करून आता तुमची मनमानी बास झाली.आजची सभा तालुक्यातील परिवर्तनाची नांदी आहे.आमचा कार्यकर्ता शिवरायांचा मावळा आहे.पाकीट संस्कृतीत वाढलेला नाही.अशा शब्दात त्यांनी थोरातांच्या दहशतीचा समाचार घेतला.

डॉ विखे पाटील यांचै लोहारै कासारे पासून जोरदार स्वागत करण्यात आले.

# अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून भाजपला सोडचिट्ठी

## शरद पवार गटात करणार प्रवेश
## मोहोळचे नेते लक्ष्मण ढोबळेंची घोषणा

**सोलापूर : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीला धक्क्यावर धक्के बसत आहेत. काही दिवसांपूर्वी भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला होता. आता मोहोळमधील भापज नेते लक्ष्मण ढोबळे हातात तुतारी घेणार आहे. अजित पवार यांच्या त्रासाला कंटाळून शरद पवार गटात जात असल्याचे ढोबळे यांनी सांगितले. मी दोन दिवसांत भाजपला राजीनामा पाठवून देतोय, असेही ते म्हणाले.**

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून अनेक इच्छुक नेते संधीसाठी पक्षांतर करत आहेत. भाजमध्ये असलेले लक्ष्मण ढोबळे हे सुद्धा मोहोळ मतदारसंघातून विधानसभा लढवण्यास इच्छुक आहेत. पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विठ्ठल माने हे मोहोळचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे महायुतीच्या जागावाटपात ही जागा अजित पवार गटाला सुटणार असल्याने लक्ष्मण ढोबळे यांनी संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे लक्ष्मण ढोबळे यांनी भाजपला सोडचिट्ठी देत तुतारी फुंकण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. लक्ष्मण ढोबळे गुरूवारी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांची भेट सुद्धा घेतली.

**काय म्हणाले लक्ष्मण ढोबळे?**

अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून मी राष्ट्रवादी सोडली आणि भाजपमध्ये आलो. पण आता अजित पवारही भाजपसोबत आले आणि पुन्हा त्रास देऊ लागले. अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून आता पुन्हा भाजप सोडत असल्याचे लक्ष्मण ढोबळे म्हणाले. पैशांच्या जीवावर राजकारण करता येते, असे अजित पवारांना वाटते.



मात्र तसे होत नाही. तुमच्या काकांनी कसे राजकारण केले ते पहा, असा सल्ला लक्ष्मण ढोबळे यांनी अजित पवारांना दिला आहे.

**...तरीही राष्ट्रवादी प्रवेश नक्की**

मी दोन दिवसांमध्ये माझा राजीनामा भाजपला पाठवून देणार असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करत असल्याचे त्यांनी सांगितले. मला मोहोळ मतदारसंघातून उमेदवारी नाही मिळाली तरी चालेल, पण आता राष्ट्रवादी प्रवेश नक्की आहे, असेही ते एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले. लक्ष्मण ढोबळे आधी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते.२०१९ मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता पुन्हा ते राष्ट्रवादीत घरवापसी करणार आहेत.

**शरद पवारांकडे नेत्यांची रांग**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. भाजपचे हर्षवर्धन पाटील, अजित पवार गटाचे दीपक चव्हाण बबन तसेच फलटण येथील निंबाळकर गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नुकताच प्रवेश केला आहे. तर माढ्याचे आमदार बबन शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेतली होती. त्यामुळे ते देखील तुतारी फुंकण्याच्या तयारीत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे यश पाहता लोकांचा शरद पवारांवर विश्वास वाढला असे, पक्षाच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे.

# दरोड्याच्या तयारीतील तिघे जेरबंद

## अंधाराचा फायदा घेत तिघे पसार

**संगमनेर : प्रतिनिधी**

**दरोडा घालण्याच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या सहा चोरट्यांपैकी तीन चोरट्यांना जेरबंद करण्यात शहर पोलिसांना यश आले. मात्र, यातील तिघांनी अंधाराचा फायदा घेत धूम ठोकल्याची घटना गुरुवारी (ता.१७) पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास शहरातील नवीन नगर रस्त्यावरील जठार हॉस्पिटलच्या मागे बागवान मळ्यात घडली असल्याने शहरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.**

शहरातील नवीन नगर रस्त्यावरील डॉ. नितीन जठार हॉस्पिटलच्या मागे असलेल्या बागवान मळ्यात बंद पडलेल्या गोडाऊन परिसरात कलीम अकबर पठाण (वय २०, रा.जमजम कॉलनी, संगमनेर




), अरमान दिलदार सय्यद (वय २०, रा. अलकानगर,संगमनेर ), समीर सब्बीर अत्तार (वय ३८, रा. बाजारपेठ संगमनेर ), सदाम मन्सुरी (रा. सय्यद बाबा चौक संगमनेर), हलीम अकबर पठाण (रा. जमजम कॉलनी संगमनेर) आणि प्रशांत (पूर्ण नाव माहित नाही) हे सर्वजण अंधारामध्ये कुठतरी दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना शहर पोलिसांनी छापा टाकत यातील कलीम अकबर पठाण, अरमान दिलदार सय्यद आणि समीर सब्बीर अत्तार यांना जागेवर जेरबंद केले. मात्र, सदाम मन्सुरी, हलीम अकबर आणि प्रशांत हे तिघे अंधाराचा फायदा घेत पसार होण्यात यशस्वी झाले.

ताब्यात घेण्यात आलेल्या चोरट्यांकडून एक लोखंडी कटावणी, एक गलोर, लोखंडी गोल रॉड आदी दरोडा टाकण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य पोलिसांनी जप्त केले. याप्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल लुमा राघू भांगरे यांनी शहर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अभंग करत आहेत.






# कृषि प्रदर्शनात सोन्या-मोन्याच्या जोडीचे आकर्षण!

## ■ खाऊ गल्लीमध्ये खवय्यांची झुंबड ■ दिडशेहून अधिक स्टॉल ■ शेती विषयक स्टॉलकडे शेतकऱ्यांचा ओढा

पारनेर : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके व जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनामध्ये बारामतीच्या सोन्या-मोन्या बैलांच्या जोडीचे नागरीकांना खास आकर्षण आहे. प्रदर्शनातील खाउ गल्लीमध्ये खवय्यांची झुंबड पहावयास मिळत असून शेतीविषक स्टॉलकडे शेतकऱ्यांचा ओढा असल्याचेही चित्र आहे. या प्रदर्शनात विविध प्रकारचे दिडशेहून अधिक स्टॉल आहेत.**

.या प्रदर्शनास गुरूवारी प्रारंभ झाल्यापासून नगर जिल्यासह पुणे जिल्हयातील नागरीक भेटी देत आहेत. आलेली प्रत्येक व्यक्ती काही ना काही खरेदी करून परतताना दिसत आहे. यंदा विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता असल्याने नीलेश लंके प्रतिष्ठानने खा. नीलेश लंके अथवा राणीताई लंके यांची कोणतीही जाहिरात न करता या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. खा. नीलेश लंके, राणीताई लंके यांनी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात व्यासपीठावर न बसता प्रेक्षकांमध्ये बसणे पसंत करीत आचारसंहितेचा आदर केला. नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते या प्रदर्शनाचे नेटके नियोजन करत आहेत.




■ बारामतीच्या सोन्या-मोन्याची बैलजोडी पारनेरच्या कृषि प्रदर्शनाचे आकर्षण ठरले आहे. ■ प्रदर्शन पाहून खरेदी झाल्यानंतर खाऊगल्लीमधील विविध खाद्य पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्ये गर्दी करत आहेत.

### मिल्क जनसेट

गायींची धार काढण्यासाठीचे सिध्दीविनायक जनसेट हे मशिन या प्रदर्शनात शेतकऱ्यांना भावले. मशिनने धार काढताना गायींना त्रास होत नाही. जखमाही होत नसल्याने शेतकरी वर्गाला हा मिल्क जनसेट चांगलाच भावला.

### शक्तीमान रोटोव्हेटर

खत व पाणी एकत्रीकरण, नांगरट, घसणी एकत्रीतपणे करणारे शक्तीमान रोटोव्हेटर पाहण्यासाठीही शेतकरी वर्गाने गर्दी केल्याचे पहावयास मिळाले. या रोटोव्हेटरला शेतक-यांकडून चांगली मागणी असल्याचे सांगण्यात आले.

### पिकांच्या खताचे शेडयुल

सर्व पीकांसाठी उपयुक्त बायोफर्टीलायझर्स तसेच जैविक खते प्लॅन्टो कंपनीने उपलब्ध करून दिली आहेत. पांढ्या मुळ्यांची वाढ होण्यास त्यामुळे मदत होत असून पिकांसाठी ही पुरक खते आहेत. कोणत्या पिकाला कोणते खत द्यावे याचे शेडयुलही कंपनीकडून देण्यात येते.

### सर्वाधिक विक्री होणारे ब्रँड

गहू, हरबरा, लाल कांदा, ४९६ गहू यांची बियाणे सिध्दांत व वर्धन ब्रॅडने या प्रदर्शनात उपलब्ध करून दिली आहेत. शेतकऱ्यांमध्ये दोन्ही ब्रॅड प्रसिध्द असून त्यांची महाराष्ट्रात सर्वाधिक विक्री होत असल्याचे सांगण्यात आले.

### ॲटोमिशन सिस्टम

ठिबक सिंचनामध्ये ॲटोमिशन स्टिस्टम वापरून खत, पाणी सोडणे,मोटार सुरू करणे, बंद करणे, पंधरा दिवसाने ॲटोमेटीक सिस्टम सुरु होउन खते व पाणी पुरविणे, पाउस आल्यावर पाणी व खते पुरविणे बंद करणे आदी सुविधा असलेल्या सिस्टमची माहीती जाणून घेण्याची शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता होता. नेटाफिन या कंपनीने ही सिस्टम उपलब्ध करून दिली आहे.

### मधुमक्षिका पालनाची जागृती

श्रीरामपूर येथील गोदागिरी फार्मकडून या प्रदर्शनात मधुमक्षिका पालनाबाबत जागृती करण्यात येत आहे. या मार्फकडून मधुमक्षिका पालनासाठी पेटया भाडयाने अथवा विक्री केली जात असून या व्यवसायाबाबत मार्गदर्शनही केले जाते. त्यासंदर्भात त्यांनी एक पुस्तिकाही प्रकाशित केली असून या व्यवसायातून संकलीत करण्यात आलेल्या मधाचीही स्टॉलवर विक्री करण्यात येत आहे.

### चार पत्ती कांदा

पंचशिल सिडसच्या वतीने चार पत्ती कांदा बियाणे उपलब्ध करून दिले असून त्याची सर्वाधिक विक्री होत असल्याचे सांगण्यात आले. हा कांदा आठ ते दहा महिने टिकतो. कांद्याचा कलर टीकण्याबरोबरच पत्तीही शाबूत रहात असल्याने शेतकरी वर्गाकडून या वाणाल मागणी असते.

### १ टन गांडूळ खत निर्मिती

दर दोन महिन्याला १ टन गांडूळ खत निर्मिती करणारा प्रकल्प या प्रदर्शनात सादर करण्यात आला आहे. समर्थ गांडूळ खत प्रकल्प नावाने असलेल्या या प्रकल्पामधून बाहेर पडणारे वर्मी वॉटर फवारणीसाठी उपयुक्त ठरते. हा प्रकल्प एका जागेवरून दुसऱ्या जागेवर सहज हालविता येतो. २ हजार ३०० रूपये किमतीचा हा प्रकल्प ३ किलो गांडूळ बिजासह शेतकऱ्याच्या घरी आणून बसविला जातो.

### १८ ते २० क्विंटल एकरी उत्पादन

ज्युडीओ कंपनीकडून प्रती एकर १८ ते २० एकर उत्पादन देणाऱ्या तुरीचे वाण सादर करण्यात आले असून मल्चींग पेपरवर हे उत्पादन घेता येते. मोठया उत्पादनामुळे शेतकरी वर्गाची या वाणाला चांगली मागणी असल्याचे सांगण्यात आले.

### १५ वर्षे टिकणारा शेततळयाचा कागद

हिपोशिल्ड कंपनीच्या वतीने १५ वर्षे टिकणाऱ्या व घडी पडू न फाटणाऱ्या, उन्हात तडा न जाणाऱ्या शेततळयाच्या कागदाचे सादरीकरण करण्यात आले आहे. या कागदासाठी शासकीय अनुदान असून कंपनी शेततळयाचे माप घेऊन त्याची फिटींगही करून देते. जर्मन टेक्नॉलॉजी वापरून सादर करण्यात आलेला भारतातील हा एकमेव कागद आहे.

### सोन्या मोन्याचे आकर्षण

बारामती येथील संतोष कोकणे यांच्या सोन्या-मोन्या बैलजोडीचे नागरीकांना चांगलेच आकर्षण आहे. काजळी खिलार जातीच्या या बैलजोडीचे वैशिष्ट म्हणजे ते आज्ञाधारक आहेत. कोकणे ज्या आज्ञा देतात त्या आज्ञा ते तात्काळ पाळतात. त्यांचे गुण, आज्ञाधारकपणा पाहून कृषी प्रदर्शनात त्यांना हिंद केसरी किताबाने गौरविण्यात आले.

### खाऊगल्लीत गर्दी

कोल्हापुर, पुणे आदी भागातील थालीपीठ, लोणी डोसा, चिकण लॉलीपॉप, स्प्रिंग पोटॅटो रोल, पाणी पुरी चाट, शाही फालुदा,गोबी मंच्युरिअन, कच्छी दाबेली आदी खाऊ गल्लीतील पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांची दररोज गर्दी झाल्याचे पहावयास मिळते.

# निघोजला वर्षावास प्रवचन मालिकेची सांगता

## ■ वंदना व सुत्तपठ स्पर्धा बक्षीस वितरण ■ तक्षशिला बुद्ध विहार येथे समारंभ संपन्न

निघोज : प्रतिनिधी

**भारतीय बौद्ध महासभा अहमदनगर दक्षिण विभागा अंतर्गत भारतीय बौद्ध महासभा पारनेर तालुक्याचा वतीने २१ जुलै २०२४ आषाढ पौर्णिमा ते १७ ऑक्टोबर २०२४ अश्विन पौर्णिमा केंद्रा .कडून मिळालेल्या सूचनेनुसार वर्षावासाचे आयोजन निघोज येथे करण्यात आले होते.**



कार्यक्रमाची सुरुवात धम्मपद मॉनेस्ट्रीचे श्रामनेर भंतें व मान्यवरांचा हस्ते आदर्शांचे पूजन व वंदना घेऊन मंगलमय वातावरणात करण्यात आली.कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभेचे पारनेर शाखेचे अध्यक्ष आयु. बाबाजी वाघमारे यांचा अध्यक्षतेखाली पार पडला. या वर्षावास कालखंडामध्ये गावागावात जाऊन धम्माचा प्रचार प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सध्याच्या घडीला तरूण वर्ग व उपसकांमध्ये धम्माचे अज्ञान व धम्माबाबतची उदासीनता लक्षात घेऊन लहान वयातच धम्माची गोडी लागावी या उद्देशाने मागील वर्षा पासून भारतीय बौद्ध महासभा पारनेर शाखा व आंबेडकर स्मृती संघ मुंबई निघोज यांचा संयुक्त विद्यमाने वंदना व सुत्तपठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

वर्षावास सांगता समारंभा निमित्त स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांचा हस्ते रोख पारितोषिक व पारनेर शाखेचा वतीने सन्मान चिन्ह तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाण पत्र देऊन घोषित करण्यात आले. मनोगतामध्ये आयु. वीरेंद्र पवार सर उपाध्यक्ष प्रचार व पर्यटन भारतीय बौद्ध महासभा अहमदनगर दक्षिण यांनी अश्विनी पोर्णिमेचे महत्व विषद केले तर आयु. सुभाष रामभाऊ सोनावणे अध्यक्ष आंबेडकर स्मृती संघ मुंबई निघोज, समता सैनिक यांनी वर्षा वासातील सांगता समारंभाचा विषय कमाल सुत्त - मानव मुक्तीचा जाहीरनामा या विषयावर खूप सुंदर प्रबोधन केले. तर धम्मपद मॉनेस्ट्रीतील भन्तेनी ही उपस्थिताना धम्मदेशना दिली.

सुनीतातार्ई शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना भारतीय बौद्ध महासभा पारनेर शाखा प्रत्येक वेळेस विविध चांगले उपक्रम राबवून धम्माचा प्रचार प्रसार करण्याचा प्रयत्न करत असते त्या बद्दल त्यांनी शाखेच्या सर्व पदाधिक्याचे कौतुक केले.

धम्मपद मॉनेस्ट्रीतील श्रामनेर विद्यार्थी संघ, आयु. वीरेंद्र पवार सर, आयु. रेवन साळवे, आयु. बाबाजी वाघमारे, आयु. शुभांगीताई पवार, आयु. सुभाष रामभाऊ सोनावणे, आयु. दिलीप सोनावणे, आयु. बबन सोनवणे, आयु. सुभाष सतु सोनवणे, आयु. संपत नगरे मेजर, आयु. सचिन नगरे, आयु. अमित भाऊ जाधव, आयु.किरण सोनवणे, मनोज सूर्यवंशी, आयु. विनोद तांबे, आयु. सुनील शिंदे, आयु. सुनीता ताई शिंदे, आयु. सुनंदा ताई साळवे, आयु. चंद्रकांत गायकवाड, आयु. जयवंत सोनवणे, आयु. प्रकाश करंदीकर, आयु. सुनीताताई नगरे, आयु. मधुकर साळवे, आयु. अमोल जाधव, आयु. आयु. प्रकाश तडके सर, आयु. गिरीश गायकवाड व बहुसंख्येने तालुक्यातील बौद्ध उपासक व उपासिका उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार आयु. सुनंदा ताई साळवे महिला उपाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा पारनेर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्र संचालन आयु. गिरीश गायकवाड सरचिटणीस भारतीय बौद्ध महासभा पारनेर यांनी केले.कार्यक्रमाची सांगता सरणतय व खीर दान स्वादिष्ट भोजन करून करण्यात आली. निघोज येथे गेली तीन ते चार महिन्यात संपन्न झालेल्या वर्षावास कार्यक्रमास निघोज व परिसरातील समाजबांधव व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारनेर तालुक्यातील निघोज या एकमेव गावात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# पारनेर महाविद्यालयात वाचू आनंदे उपक्रम !

## ■ विद्यार्थ्यांनी घेतली वाचन प्रतिज्ञा ■ वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य

पारनेर : प्रतिनिधी

**माजी राष्ट्रपदी भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त पारनेर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचू आनंदे हा उपक्रम राबविण्यात आला.**



भारतात दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही वाचू आनंदे हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनी विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचनाबाबत प्रतिज्ञा दिली. विद्यार्थ्यांमध्ये वाचन विषयक आवाड निर्माण होऊन डिजिटल वाचन साहित्याऐवजी प्रत्यक्ष पुस्तकांचे वाचन करावे. वाचनाने आपले भवितव्य घडविण्यास मदत होते. आपले ध्येय साध्य करण्याकरता वाचत जावे असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. भाऊसाहेब शेळके यांनी केले. डॉ. शेळके यांनी वाचनाच्या महत्वाविषयी माहीती दिली. याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, कनिष्ठ विभागाचे ज्येष्ठ प्रा. शामराव घनगावस डॉ. हनुमंत गायकवाड, डॉ. हरीश शेळके, प्रा. विश्वास गवारे, प्रा. सचिन व्यवहारे, कार्यालयीन अधिक्षक सावकार काकडे, नामदेव ठाणगे, नंदीनी चव्हाण, ज्योती पतके, सुषमा भोजणे, दत्ता पळसकर यांच्यासह कमवा व शिका योजनेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी, स्पर्धा परिक्ष विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील इतर सर्व वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथालयाचे लिपिक नामदेव ठाणगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डॉ. कुंदा कवडे युजीसी नेट परीक्षा उत्तीर्ण

## मराठीच्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठी परिक्षा

अळकुटी : प्रतिनिधी

**लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथील प्रभारी प्राचार्या तथा मराठी विभागप्रमुख डॉ. कुंदा कवडे या मराठी विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक पदासाठी नुकत्याच पार पडलेल्या युजीसी नेट २०२४ च्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत.**



डॉ. कुंदा कवडे यांनी अळकुटी महाविद्यालयात गेली १९ वर्षे अध्यापनाचे कार्य केले आहे. यादरम्यान त्यांनी आंतरराष्ट्रीय तथा राष्ट्रीय पातळीवरील तीसहून अधिक संशोधन पेपर प्रकाशित केले आहेत. यापूर्वी त्या सेट परीक्षाही उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे पीएच. डी. ची पदवीही संपादन केली आहे. तसेच त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल राष्ट्रीय तथा राज्यस्तरीय त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, अहमदनगर दक्षिणचे मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ, मराठी पत्रकार संघ यांचे पदाधिकारी व सदस्य तसेच पत्रकार संघ विभागीय निघोज कार्यालयाचे मुख्य समन्वयक दत्तात्रय उनवणे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्याच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अविनाश लंके यांची दंत सहाय्यकपदी निवड

## ■ श्री.मुलिकादेवी विद्यालयात सत्कार ■ हिंमतीने केले परिस्थितीवर मात

वडगांव गुंड : प्रतिनिधी

**वडगांव गुंड येथील सर्वसामान्य शेतकरी कुटूंबातील तरूण अविनाश पोपट लंके यांची महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात दंत सहाय्यक म्हणून नुकतीच नियुक्ती झाली. त्यांचा निघोज येथील श्री मुलिकादेवी विद्यालयात सत्कार करण्यात आला.**



अविनाश लंके हे गाडीलगांव परिसरात सामाजिक व शैक्षणिक कामात त्यांचा नावलौकीक आहे. अविनाश लंके यांचे प्राथमिक शिक्षण वडगांव गुंड येथे झाले. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण श्री मुलिकादेवी विद्यालय निघोज येथे तर विज्ञान विषयातील पदवीचे शिक्षण शिरूर जिल्हा पुणे येथील सी.टी.बोरा महाविद्यालयात झाले. अविनाश यांची कौटूंबिक स्थिती हालाखीची असताना त्यावर मात करून त्यांनी हिंमतीचे आपले शिक्षण पुर्ण केले. वडील अपंग असल्याने घरची संपूर्ण जबाबदारी त्यांचरू आईने सांभाळून मुलांना उच्च शिक्षण दिले. घरी केवळ एकरभर शेती असल्याने आई वडील मोल मजुरी करून चरितार्थ चालवितात.

सन २०२३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने आरोग्य विभागात दंत सहाय्यक पदाची भरती करण्यात आली. ८० जागांसाठी ३० .हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. अविनाश यांनी खडतर मेहनत करीत अभ्यासात सातत्य ठेवत या परीक्षेची तयारी करून या परीक्षेत यश संपादन करीत यशाला गवसणी घातली. आपल्या विद्यालयाच्या विद्यार्थ्याने यश मिळविल्याबद्दल श्री.मुलिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.आहेर यांनी अविनाश लंके यांचा सत्कार करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. निघोज व पंचक्रोशीतून अविनाश लंके यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com